# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः09.08.2024** **वारःशुक्रवार**

---

1. वक्फ-सुधारणा विधेयक लोकसभेत सादर
2. रिझर्व बँकेच्या द्वैमासिक पत धोरणात प्रमुख व्याजदर कायम
3. हर घर तिरंगा अभियानाला मुंबईतल्या ऑगस्ट क्रांती मैदानातून आज होणार प्रारंभ
4. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भालाफेकपटू नीरज चोप्राची रौप्य पदकाला गवसणी; तर भारतीय पुरुष हॉकी संघाला कास्य पदक आणि
5. कोल्हापुरातील ऐतिहासिक संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहाला भीषण आग; कलाक्षेत्रातून हळहळ व्यक्त

**वक्फ विधेयक**

वक्फ कायदा 1995मध्ये सुधारणा करण्यासाठी वक्फ - सुधारणा विधेयक 2024 संसदीय कामकाज आणि अल्पसंख्याक कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी काल लोकसभेत सादर केलं. या विधेयकाद्वारे राज्य वक्फ बोर्डांचे अधिकार आणि कार्यप्रणाली तसंच वक्फ मालमत्तेची नोंदणी आणि सर्वेक्षणाशी संबंधित समस्यांचं निराकरण करण्याचा प्रयत्न असल्याचं रिजिजू यांनी सांगितलं. जेडीयू आणि शिवसेनेने या विधेयकाला पाठिंबा दर्शवला असून काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, समाजवादी पक्ष आणि एआयएम या पक्षांनी विधेयकाला विरोध दर्शवला आहे. हे विधेयक आता संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आलं आहे.

भारतीय वायुयान विधेयक 2024 देखील काल लोकसभेत सादर करण्यात आलं. केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापू राममोहन नायडू यांनी ही विधेयक मांडलं. या विधेयकाद्वारे कोणत्याही विमानासाठी किंवा विमानांच्या श्रेणीसाठी, विमानाच्या संचालनाच्या सुरक्षिततेसाठी आणि कोणत्याही हवाई अपघाताच्या किंवा घटनेच्या तपासासाठी नियम बनवण्याचे अधिकार केंद्र सरकारला मिळणार आहेत.

**रिजर्वबँक**

भारतीय रिझर्व बँकेनं काल जाहीर केलेल्या द्वैमासिक पतधोरणात सलग नवव्यांदा रेपो दर साडे सहा टक्क्यांवर कायम ठेवला आहे. यात स्थायी ठेवींवरचा व्याज दर 6 पूर्णांक 25 शतांश टक्के राहणार आहे. तर मुदत ठेवींवरचा व्याज दर आणि बँकांचा व्याज दर 6 पूर्णांक 75 शतांश टक्क्यावर कायम राहील, असं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी सांगितलं. या आर्थिक वर्षात सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर 7 पूर्णांक 2 दशांश टक्के राहील असा अंदाज यात व्यक्त करण्यात आला आहे.

**राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार-यवतमाळ**

यवतमाळच्या मुकूटबन इथल्या डॉ विवेक पोलशेट्टीवार यांना रसायनशास्त्रातील योगदानासाठी शांती स्वरूप भटनागर पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या 23 ऑगस्टला दिल्लीत राष्ट्रपतींच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल. डॉ पोलशेट्टीवार सध्या टाटा मूलभूत संशोधन संस्थेमध्ये प्रोफेसर आहेत. हवेतील कार्बनचे घटक वेगळे करून त्याचे उपयोगी घटकात रुपांतर करण्याबाबत त्यांनी संशोधन केलं आहे. प्रदुषण मुक्तीच्या दिशेने टाकलेलं हे महत्त्वाचं पाऊल मानलं जातं. हवामान बदल, जागतिक

तापमान वाढ या विषयावर पोलशेट्टीवार संशोधन करत असून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकांमध्ये त्यांचे शोध प्रबंध प्रसिद्ध झाले आहेत.

**हर घर तिरंगा**

ऑगस्ट क्रांती दिनाचं औचित्य साधून मुंबईतल्या ऑगस्ट क्रांती मैदानातून आज राज्यातल्या हर घर तिरंगा मोहिमेला प्रारंभ होणार आहे. स्वातंत्र्यदिनापर्यंत राबवण्यात येणाऱ्या या मोहिमेत सर्वांना सहभागी करुन घ्यावं, असं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं. काल मुंबईत आयोजित बैठकीत त्यांनी या मोहिमेच्या तयारीचा आढावा घेतला. घरोघरी तिरंगा हे अभियान राष्ट्रभक्ती चेतवणारं अभियान असून या काळात प्रत्येक दिवशी मिरवणुका, मॅरेथॉन, सांस्कृतिक कार्यक्रमांसह अनेक अभिनव उपक्रमांचं आयोजन केलं आहे. या उपक्रमांमुळे सगळीकडे देशभक्तीमय वातावरण तयार होणार आहे. या अभियानात जनसहभाग वाढण्यासाठी विविध माध्यमातून जनजागृती करावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

**मुख्यमंत्री रस्ते**

ठाणे-नाशिक, आणि मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील खड्ड्यांची तातडीने दुरुस्ती करावी. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत. या संदर्भात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली काल बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. दरम्यान गणेशोत्सवापूर्वीच मुंबई गोवा मार्गावरील खड्डे बुजवण्यात येतील असं आश्वासन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिलं आहे. या संबंधीचं निवेदन खासदार रविंद्र वायकर यांनी गडकरी यांना दिलं होतं.

**ऑलिंपिक नीरज**

पॅरिस ऑलिंपिकमध्ये भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्रानं रौप्य पदक पटकावलं आहे. काल रात्री झालेल्या अंतिम स्पर्धेत; 89 पूर्णांक 45 मीटर लांब भालाफेक करत नीरजनं रौप्य पदकावर आपलं नाव कोरलं. स्वातंत्र्योत्तर काळात ॲथलेटिक्समध्ये 2 पदकं जिंकणारा नीरज हा पहिलाच भारतीय खेळाडू ठरला आहे. कालच्या स्पर्धेत पाकिस्तानच्या अर्शद नदीम यानं 92 पूर्णांक 97 मीटर भालाफेक करत सुवर्ण पदक पटकावलं आहे. दरम्यान राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नीरज चोप्राचं अभिनंदन केलं आहे. नीरजच्या या विजयामुळे भावी पिढीला प्रेरणा मिळणार असल्याचं राष्ट्रपति मुर्मू यांनी समाज माध्यमांवरील संदेशात म्हटलं आहे. तर नीरजनं पुन्हा एकदा आपल्या सर्वोत्तम प्रतिभेचं प्रदर्शन केलं असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**ऑलिंपिक हॉकी**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारतीय हॉकी संघानं कास्य पदक पटकावलं आहे. काल झालेल्या कास्य पदकासाठीच्या लढतीत भारताने स्पेनचा 2-1 असा पराभव केला. या विजयानंतर भारतीय संघावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी तसंच विविध केंद्रीय मंत्र्यांनी भारताच्या पुरुष हॉकी संघाचं अभिनंदन केलं आहे.

**स्वप्नील कुसाळे**

पॅरिस ऑलिंपिकमध्ये 50 मीटर रायफल थ्री पोझिशन प्रकारात कास्यपदक मिळवणाऱ्या महाराष्ट्राच्या स्वप्निल कुसाळे याचं काल पुण्यात जल्लोषात स्वागत करण्यात आलं. महाळुंगे बालेवाडी इथल्या क्रीडा संकुलात क्रीडा संचालनालयाच्या वतीने क्रीडा आयुक्त राजेश देशमुख, उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने त्याला सन्मानित करण्यात आलं. यावेळी बोलताना स्वप्नील म्हणाला...

**आदिवासी दिन-नंदुरबार**

जागतिक आदिवासी दिनानिमित्त नंदुरबार इथं तीन दिवसांच्या आदिवासी महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. या निमित्तानं काल नंदुरबार शहरातून भव्य फेरी काढण्यात आली. राज्यभरातून आलेल्या आदिवासी कलापथकांनी यावेळी विविध

नृत्याविष्कार सादर केले. राज्याचे आदिवासी विकास मंत्री विजयकुमार गावित देखील यामध्ये सहभागी झाले होते. जागतिक आदिवासी दिनानिमित्त पुणे जिल्ह्यातील आंबेगाव, जुन्नर आणि मावळ तालुक्यातील आदिवासी बहुल गावामध्ये जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी आज सुट्टी जाहीर केली आहे.

**अजीत पवार लाडकी बहिण-नाशिक**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा पहिला हप्ता 17 ऑगस्टपर्यंत लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा होणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल नाशिक जिल्ह्यात दिली. राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या जनसन्मान यात्रेचा प्रारंभ दिंडोरीमध्ये झाला; त्यावेळी ते बोलत होते. ही योजना कुठल्याही राजकीय फायद्यासाठी आणली नाही; तर महिलांच्या सबलीकरणासाठी लाडक्या बहिणींना दीड हजार रूपये देण्याचा निर्णय घेतला, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

**नागपंचमी-सांगली**

सांगली जिल्ह्यातील शिराळ्यामध्ये आज नागपंचमीचा सण प्रतिकात्मक पद्धतीनं साजरा करण्यात येणार आहे. नागपंचमी उत्सवानिमित्त शहरात पोलीस आणि वन विभागानं मोठ्या प्रमाणात बंदोबस्त ठेवला आहे.

**जरांगे-सांगली**

मराठा समाजाला आरक्षण मिळावं या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी काल सांगलीत शांतता फेरी काढली. यामध्ये मराठा बांधव मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

**आग-कोल्हापूर**

कोल्हापुरातील ऐतिहासिक संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहाला काल रात्री भीषण आग लागली. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अग्निशमन दलाचे प्रयत्न उशीरापर्यंत सुरू होते. शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचं स्पष्ट झालं आहे. या घटनेत कुठलीही जीवितहानी झाली नंही; मात्र नाट्यगृहाचं छत आणि रंगमचही जळून खाक झाला आहे. संगीतसूर्य नटसम्राट केशवराव भोसले यांच्या 134 जयंती दिनाच्या पूर्वसंध्येला ही दुर्घटना घडल्यामुळे कला क्षेत्रातून हळहळ व्यक्त होत आहे.

**अपघात-धुळे**

धुळे जिल्ह्यातल्या शिरपूर तालुक्यातील तोरणमाळ इथं पर्यटनासाठी आलेल्या एका युवकाचा सेल्फी काढतांना मृत्यू झाला. निसरड्या कड्यावरून पाय घसरून हा युवक दीड हजार फूट खोल दरीत पडला; 4 ऑगस्ट रोजी ही घटना घडली; यानंतर तीन चार दिवसांनी त्याचा मृतदेह सीताखाई मधून बाहेर काढण्यात आला आहे.

**हवामान**

येत्या 24 तासात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे. मराठवाडा आणि विदर्भातही काही ठिकाणी पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार